शासकीय कंत्राटासाठी वस्तु व
सेवाकर बाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२१ (भाग-२)/इमारती-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २७/०९/२०१२

**वाचा :-** १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.जीएसटी २०१७/प्र.क्र.१५५/कराधान-१, दि.१९/०९/२०१७
२) Government fo India, Ministry of Finance Notification No.११/२०१७, दि.२८/०६/२०१७
३) शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.MGST १०१७/CR १०३ (१०)/Taxation, dt.२९/०६/२०१७
४) Government of India, Ministry of Finance Notification No.२०/२०१७, दि.२२/०८/२०१७
५) शासन परिपत्रक सा.बां.वि.क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र.१२१/२०१७ (भाग-२)/इमा-२, दि.१९/०९/२०१७
६) Government fo India, Ministry of Finance Notification No.०३/२०२२. दि.१३/०७/२०२२
७) शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.GST १०२२/CR ३४/Taxtion, dt, ८/८/२०२२

**प्रस्तावना**

जीएसटी अंमलबजावणी दि.१ जुलै २०१७ पासून सुरु करण्यात आली आहे. संदर्भ क्र.१ येथील शासन परिपत्रकान्वये बहूतांशी शासकीय कार्यकंत्राटावर वस्तु व सेवा कर १२% निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार संदर्भ क्र.५ च्या शासन परिपत्रकानुसार सूचना देण्यात आल्या होत्या.

२. आता संदर्भ क्र.६ व संदर्भ क्र.७ च्या शासन अधिसूचनेव्दारे यापूर्वी दि.२८/६/२०१७ च्या अधिसूचनेव्दारे अधिसूचित केलेल्या शासकीय कार्यकंत्राटाबाबतच्या काही तरतुदी वगळण्यात आल्या आहेत. आता, बांधकाम सेवांसाठी १८% (९% CGST + ९% SGST) असा दर निश्चित करण्यात आला आहे. सदर दर हा दि.१८/०७/२०२२ रोजीपासून लागु करण्यात आला आहे.

**परिपत्रक :-**

आता उक्त झालेला बदल विचारात घेऊन खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**अ) नवीन कामांची अंदाजपत्रके :-** दि.१९/०९/२०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये नवीन अंदाजपत्रके तयार करताना प्रचलित वस्तु व सेवा कराच्या दरानुसार अंदाजपत्रके तयार करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन आता नवीन अंदाजपत्रके तयार करतांना वस्तु व सेवा कर १८% घेण्यात यावा.

**ब) चालू कामांची देयके :-** सद्यस्थितीत चालू असलेल्या ज्या कामांच्या निविदा व वस्तु व सेवा कर वगळून मागविण्यात आलेल्या आहेत, अशा कामांची देयके १२% वस्तु व सेवाकर परिगणित करुन अदा करण्यात येतात. आता अशा चालू कामांची देयके निविदा अटी व शर्तीच्या अधिन राहून बदललेल्या १८% वस्तु व सेवाकरांनुसार देयके पारित करावीत.

ज्या चालू कामांच्या निविदा वस्तु व सेवाकरासह मागविण्यात आलेल्या आहेत, अशा कामांसाठी देयके पारित करीत असतांना बदललेल्या १८% वस्तु व सेवाकर विचारात घेऊन निविदा अटी व शर्तीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०९२७१६१९४८५११८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVINDRA SITARAM JARANDE
Date: 2022.09.27 16:51:39 +05'30'

**( रविंद्र जरांडे )**

**आ.वि.स.स. व उ.स.**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
६. सार्वजनिक बांधकाम विभाग/वित्त विभाग/ग्रामविकास विभाग
७. महालेखापाल-१/२, मुंबई/नागपूर
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर
९. सर्व मुख्य अभियंता (विद्युतसह), सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग
१०.मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई
११.संचालक, उद्याने व उपवने, मुंबई
१२.सर्व अधीक्षक अभियंता (विद्युत व यांत्रिकी सह), सार्वजनिक बांधकाम मंडळ
१३.अधीक्षक अभियंते यांनी आपल्या अधिनस्त विभागातील कार्यालयांना सदर शासन निर्णयाची प्रत अग्रेषित करावी.
१४.मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई
१५.कार्यासन इमारती-२ निवड नस्ती.

जा.क्र.मिभामनपा/लेखा/परिपत्रक/241/2022-23
लेखा विभाग, चौथा मजला
मिरा-भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- 07/10/2022

**//परिपत्रक//**

**विषय :- शासकिय कंत्राटीसाठी वस्तू व सेवाकराबाबत.**

**संदर्भ :- शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2017/प्र.क्र121 (भाग-2)/इमारती-2, दि.27/09/2022.**

वरील संदर्भिय् विषयानुसार शासकिय कंत्राटीसाठी वस्तू व सेवा कराबाबतीतील सुचना शासनाकडून प्राप्त झालेल्या आहेत. सदर परिपत्रकात नमूद केलेल्या सुचनांचे पालन करून यापुढील देयके सादर करण्यांत यावी.

(अजित कुलकर्णी)
**(प्र.) मुख्यलेखाधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

सोबत :- संदर्भिय परिपत्रक